**CNR No. MHBI140005822024**

## नि. क्र. ६ खाली आदेश
## (दिनांक १५ ऑक्टोबर,२०२५)

वादींनी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १, ४ ते ६ यांनी वाद मिळकत दाव्याचा निकाल होईपर्यंत इतर कोणाला हस्तांतरीत करू नये या तुर्तातुर्त मनाई मागणी करीता दाखल केला आहे.

### वादींचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे –

२. वादी हे मौजे धनगरवाडी, ता.आष्टी, जि.बीड येथील रहिवाशी आहेत. मौजे धनगरवाडी (डोईठाण), ता.आष्टी, जि.बीड येथील गट नं.१/७ पैकी ०.१५ आर, गट नं. १५/१/क पैकी ०.२० आर, गट नं. ५/१ पैकी १.३६ हेक्टर आर, गट नं. ५६/उ/६ पैकी ०.३८आर, गट नं. ६/१ पैकी ०.२३ आर आणि गट नं. ९/१ पैकी १.०७ हेक्टर आर या मिळकतीबाबत वाटपाचा दावा दाखल केला आहे. सदर मिळकतीस यापुढे वाद मिळकत असे संबोधण्यात यावे. वादी कथन करतात की, वाद मिळकत ही एकत्र कुटूंबाची वडिलोपार्जित मिळकत आहे. वादी क्र. १ चे आजोबा दशरथ हे त्यांचे कुटूंबातील मुळ पुरूष होते. त्यांचे वाटप झाल्यामुळे फेरफार क्र. ६४ अन्वये दशरथ, वादी क्र. १ चे वडिल भास्कर, चुलते सर्जेराव यांचे नाव वाद मिळकतवर नोंद झाली. तसेच दशरथ यांचे मृत्यूनंतर फेरफार क्र. २२४ मंजूर होऊन वारस नाव नोंद झाली. भास्कर यांचा मृत्यू दिनांक १९/०३/२००९ रोजी झाला. भास्कर याचे वादी हे कायदेशीर वारस असून फेरफार क्र. ३०८ अन्वये त्यांची मिळकत अभिलेखलावर नावे नोंद झाली. वादी कथन करतात की, वाद मिळकतीचे अदयाप

सरसनिरस मानाने वाटप झालेले नसताना प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ५ आणि ६ यांना वादमिळकत गट नं. ५६/उ/६ आणि गट नं. ५/१ मधील क्षेत्र विक्री केले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ आणि ६ यांना दाव्यामध्ये पक्षकार केले आहे. प्रतिवादी क्र. १ याला कोणतीही कायदेशीर अडचण नसताना देखील त्याने वाद मिळकत खरेदी दस्त क्र. २४२१/२००४ आणि १८९४/२००९ अन्वये विक्री केली. वादी कथन करतात की, सदरचे खरेदी दस्त त्यांचे हक्कावर बंधनकारक नाहीत.

**३.** वादी कथन करतात की, गट नं. ९/१ ही मिळकत वादी क्र. २ ने तिचा पती मयत झाल्यानंतर स्वकष्टाने संदीप विष्णु तरटे याचेकडून रक्कम रु.१,००,०००/– मोबदला देवून खरेदी केली आहे. वादीने त्यापैकी ०.४० आर क्षेत्र हे कौटूंबिक गरजेपोटी कुंताबाई सकुंडे यांना विकी केले. वादींनी प्रतिवादींकडे वाद मिळकतीमधील समाईक हिस्सा वाटप करून मागितला असता प्रतिवादींनी स्पष्ट नकार दिला. वादींनी वादातील खरेदी दस्त त्यांचेवर बंधनकारक नाही असे कथन केले आहे. वादी कथन करतात की, वाद मिळकतीचे अदयाप वाटप झाले नसल्यामुळे वाद मिळकत विक्री केल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होवू शकते. एकंदरीत वाद मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा समाईक हिस्सा आहे. वादीने प्रथम दर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरीमीत नुकसान हे घटक शाबीत केले असल्यामुळे तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे.

**४.** प्रतिवादी क्र.१ आणि ४ यानी नि. क्र.१४ वर तुर्तातुर्त मनाई अर्जावर म्हणणे दाखल करुन त्याच्या विरुध्द केलेली सर्व कथने नाकरलेली आहेत. प्रतिवादी कथन करतात की, वाद मिळकती वादी व प्रतिवादी यांचे वडिलार्जीत होत्या. वादी व प्रतिवादी यांचे पुर्व हक्कदार दशरथ यांनी फेरफार क्र. ६४ अन्वये दोन्ही मुलांना मिळकती वाटप करून दिलेल्या आहेत. प्रतिवादी कथन करतात की, दिनांक १५/०७/१९९७ रोजी दशरथ यांचा मृत्यू झाला. दशरथ यांचे नावावरील मिळकत दि. १५/०८/१९९७ रोजी त्यांची मुले सर्जेराव आणि भास्कर यांनी वाटप घेतलेल्या आहेत आणि त्यानंतर ते स्वतंत्र वहिवाट करीत आले. भास्कर हा दिनांक १९/०३/२००९ रोजी मयत

झाल्यानंतर फेरफार क्र. ३०८ अन्वये त्याची पत्नी, मुले यांचे नावे नोंद झाली. सन १९९२ पासुन दशरथ, सर्जेराव आणि भास्कर हे जमीनीचे वाटप करून स्वतंत्र वहिवाट करत आले आहेत.

५. प्रतिवादी कथन करतात की, गट नं. ५/१ मधील भास्कर याने वाटपात आल्यानंतर ०.२० आर क्षेत्र लक्ष्मण नन्नवरे, तसेच ०.२० आर क्षेत्र सुभाष भगवान नन्नवरे, ०.२० आर क्षेत्र शंकुतला शिवाजी नन्नवरे, ०.४० आर क्षेत्र आशाबाई जालिंदर नन्नवरे यांना विक्री केले तसेच ०.२० आर क्षेत्र मुरलीधर एकनाथ नन्नवरे यांना विक्री केले. तसेच काही क्षेत्र महाराष्ट्र शासनाने पाझर तलावाकरिता संपादन केले. त्याचा मावेजा वादीने घेतलेला आहे. प्रतिवादी कथन करतात की, गट नं. ५६/उ/६ मधील ०.१९ आर क्षेत्र भास्करने त्रींबक तुळशीराम नन्नवरे यास विक्री केले, गट नं. ६/१ पैकी ०.२४ आर क्षेत्र गुलाम मुतालीब मुल्ला यांना विक्री केले. तसेच वादीने गट नं. ९/१ मधील ०.४० आर क्षेत्र कुंताबाई सकुंडे यांना विक्री केले. वादींनी सदर खरेदीदार यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन सामील केले नाही. त्यामुळे दाव्यास आवश्यक पक्षकार जोडले नसल्याची बाधा निर्माण होते. प्रतिवादी कथन करतात की, प्रतिवादी क्र. १ ने त्याचे हिश्याचे क्षेत्र आजारपणामुळे खर्च झाला म्हणून विक्री केले होते. प्रतिवादी कथन करतात की, फेरफार क्र. ६४ अन्वये सन १९९२ मध्ये मिळकतीचे वाटप झालेले आहे. त्यानंतर मिळकतीचे तोंडी वाटप दोनही भावामध्ये झालेले आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा चालण्यास पात्र नसताना वादींनी खोटे कथन केले आहे. प्रतिवादीतर्फे अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

६. वादी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.बी.बी.गर्जे आणि प्रतिवादी क्र.१ व ४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.बी.म्हस्के यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी क्र.५ व ६ तर्फे अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले नाही तसेच कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे विनायुक्तीवाद चालविण्यात आला.

**७.** वादीच्या अर्जातील कथन, प्रतिवादीच्या म्हणणे मधील कथन तसेच युक्तीवाद ऐकल्यावर पुढील मुद्दे माझेपुढे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादींच्या हक्कामध्ये आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजूने आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वादींच्या हक्कामध्ये तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर त्यांचे पैशात न भरुन येणार नुकसान होणार आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u> –

८. सदर तिन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यावरील कारणमिमांसा मी एकत्रीत नोंदवित आहे.

**९.** वादीं तर्फे विद्वान विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी हे नन्नवरे कुटूंबातील असुन त्यांचे मुळ पुरूष दशरथ नन्नवरे होते. वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुटूंबाची वडिलोपार्जित मिळकत आहे. वाद मिळकतीचे अदयाप वादी व प्रतिवादीमध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादी क्र. १ चे वडिल तसेच वादी क्र. २ चे पती भास्कर यांचा मृत्यू दिनांक १९/०३/२००९ रोजी झाला. वादी क्र. १ ने वाद मिळकत ९/१ क्षेत्र १ हेक्टर ०७ आर स्वकष्टाने खरेदी घेतली. वादी क्र. २ ला आर्थीक अडचण आल्यामुळे तीने त्यापैकी ०.४० आर क्षेत्र कुतांबाई सकुंडे यांना विक्री केले. प्रतिवादी क्र. १ याला कोणतीही कायदेशीर अडचण नसताना

त्याने वाद मिळकत गट क्र. ५६/उ/६ मधील क्षेत्र तसेच गट क्र. ५/१ मधील क्षेत्र प्रतिवादी क्र. ५ आणि ६ यांना विक्री केले. एकंदरीत एकत्र कुटूंबाचे मिळकतीचे वाटप झाले नसल्याने प्रतिवादी क्र. १, ४ ते ६ हे महसुल अभिलेखातील नोंदीचा गैरफायदा घेवून वाद मिळकत हस्तांतर करू शकतात.

**१०.** वादीतर्फे विधीज्ञ यांनी पुढे युक्तीवाद केला की, वादींनी दाव्यासमवेत महत्वाचे दस्तऐवज सादर केले आहेत. सदरचे दस्तऐवज हे महसुल अभिलेखातील ७/१२ उतारा, ८अ उतारा, फेरफार असे आहेत. प्रतिवादींनी त्यांची केस शाबीत करणेकरिता कोणताही दस्तऐवज दाव्याकामी दाखल केलेला नाही. वादींनी प्रथम दर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरीमीत नुकसान हे घटक शाबीत केलेले आहेत. अशा परिस्थीतिमध्ये प्रतिवादी विरूध्द तुर्तातुर्त मनाई मंजुर होणे आवश्यक आहे अन्यथा वादींचे कधीही न भरून येणारे नुकसान होवू शकते. तसेच दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. वादीतर्फे अर्ज मंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

**११.** याउलट, प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंधाबाबत कोणताही वाद नाही परंतु वादींनी वाद मिळकत ही एकत्र कुटूंबाची आणि वडिलोपार्जित मिळकत आहे असे प्रथम दर्शनी शाबीत केलेले नाही. वादी व प्रतिवादी यांचे कुटूंबाचे मुळ पुरूष दशरथ यांचा मृत्यू झाल्यानंतर वादी यांचे पुर्वहक्कदार भास्कर आणि प्रतिवादी क्र. १ सर्जेराव यांचेमध्ये तोंडी वाटप झाले. प्रतिवादी क्र. १ ने सन २००४ आणि सन २००९ मध्ये कायदेशीर गरजेपोटी वाद मिळकत गट क्र. ५६/उ/६ आणि गट नं. ५/१ मधील क्षेत्र प्रतिवादी क्र. ५ आणि ६ यांना विक्री केले. सदर वाटप होवून आलेल्या मिळकती करिता वादींचा कोणताही हक्क संबंध नसताना खोटया मजकुराचा दावा वादींनी दाखल केला. वादींनी दाव्यामध्ये त्यांचे पुर्वहक्कदार भास्कर याने विक्री केलेल्या वाद मिळकतीचे कथन दाव्यामध्ये केलेले नाही. वादी क्र. २ ने गट क्र. ९/१ मधील ०.४०आर क्षेत्र कुंताबाई सकुंडे यांना विक्री केले परंतु त्यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही. दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन खरेदीदार यांना सामील न केल्यामुळे दावा चालण्यास पात्र नाही.

**१२.** प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी पुढे युक्तीवाद केला की, वाद मिळकतीतील काही क्षेत्र तलावाकरिता संपादीत करण्यात आले. सदर महाराष्ट्र शासनाने तलावाकरिता संपादीत केलेल्या क्षेत्राचा मावेजा वादींनी घेतलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये वादींना पुर्वीचे वाटप मान्य असल्याचे दिसुन येते. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे महसुल अभिलेखाचे दस्तऐवजावर भिस्त ठेवण्यात आली. परंतु वाद मिळकतीचे पुर्वी वाटप झाले असल्याने तसेच वाद मिळकतीमधील हिस्सा वादी व प्रतिवादी यांनी विक्री केलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ आणि ६ हे खरेदीदार असून इतर खरेदीदार यांना वादींनी दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील केलेले नाही. वादीच्या लाभात प्रथम दर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरीमीत नुकसान हे घटक शाबीत होत नाहीत. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**१३.** वादी व प्रतिवादी यांचे तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर तसेच अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादींनी प्रथम दर्शनी केस त्यांचे लाभात आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे. वादीतर्फे नि.क्र. ४ वर दाखल असलेल्या कागदावर भिस्त ठेवण्यात आली. सदर यादी समवेत दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अ.क्र. ६ ते ११ वर वादींनी वाद मिळकतीचे ७/१२ पत्रक दाखल केलेले आहेत. सदर ७/१२ पत्रकांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट नं. १/७ मध्ये वादींचे ०.०३ आर क्षेत्राकरिता भोगवटदार म्हणुन नाव नोंद आहे. गट क्र. १५/१/क मध्ये वादींचे ०.०४ आर क्षेत्रास भोगवटदार म्हणुन नाव नोंद आहे. तसेच गट क्र. ५/१ मधुन वादींचे नाव कमी करण्यात आले आहे. तसेच गट क्र. ६/१ मध्ये प्रतिवादी क्र. १चे नावे ०.२३आर क्षेत्र, गुलाब मुल्ला यांचे नावे ०.२४ आर क्षेत्र तसेच मुरलीधर नन्नवरे यांचे नावे ०.२९ आर क्षेत्र नोंद आहे. गट क्र. ९/१ चे ७/१२ पाहिला असता असे दिसुन येते की, वादींचे नावे ०.६७ आर क्षेत्र नोंद असून कुंताबाई सकुंडे यांचे नावे ०.४० आर क्षेत्र नोंद आहे. वादीतर्फे फेरफार क्र. ६४ तसेच २२४ आणि ३०८ वर भिस्त ठेवण्यात आली. सदरचे फेरफार हे वारस नोंदीचे आणि वाटपाचे फेरफार असल्याचे दिसुन येते. फेरफार क्र. ६४ मध्ये एकनाथ नन्नवरे यांनी त्यांची मिळकत मुले, भाउ, पुतणे यांचे नावे वाटपाने

दिल्याचे प्रथम दर्शनी दिसते.

**१४.** वादी व प्रतिवादी यांचे कथनावरून असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. १ ने गट क्र. ५६/उ/६ मधील क्षेत्र तसेच गट क्र. ५/१ मधील क्षेत्र प्रतिवादी क्र. ५ आणि ६ यांना विक्री केले. तसेच वादी क्र. १ ने गट क्र. ९/१ मधील १ हेक्टर ०७ आर पैकी ०.४० आर क्षेत्र कुंताबाई सकुंडे यांना विक्री केले. वादीने सदर मिळकत स्वकष्टार्जीत असल्याचे कथन केले आहे परंतु दाव्यामध्ये गट क्र. ९/१ चे क्षेत्र १ हेक्टर ०७ आर असे विहीर हिस्सासह नमुद केले आहे. प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, वादींनी कुंताबाई सकुंडे यांना दाव्यामध्ये पक्षकार केले नसुन गट क्र. ९/१ चे क्षेत्र दाव्यामध्ये १ हेक्टर ०७ आर विहीर हिस्सासह असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ५ आणि ६ हे खरेदीदार आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ चे कथनावरून वादी क्र. २ चे पती भास्कर यांनी वाद मिळकत गट क्र. ५/१ मधील क्षेत्र लक्ष्मण नन्नवरे, सुभाष नन्नवरे, शकुंतला नन्नवरे, आशाबाई नन्नवरे आणि मुरलीधर नन्नवरे यांना विक्री केलेले आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर खरेदीदार यांची नावे ७/१२ पत्रकावर निदर्शनास येतात. एकंदरीत वादींनी वाद मिळकती मधील क्षेत्र पुर्वी विक्री केल्याचे तथ्य दाव्यामध्ये कथन केले नाही. भास्कर याने गट क्र. ६/१ मधील ०.२४ आर क्षेत्र गुलाम मुल्ला यांना विक्री केल्याचे अभिलेखावरील कथनावरून दिसुन येते. प्रतिवादी क्र. १ याने सन २००४ आणि सन २००९ मध्ये खरेदीदस्त केल्याचे कथन वादी यांनी केले असुन सदर वाटपाची मागणी सन २०२४ मध्ये करून प्रतिवादी क्र. १ ४ ते ६ यांनी वादमिळकत विक्री करू नये असे कथन केले आहे. त्यामुळे वादी यांना वाद मिळकत एकत्र कुटुंबाची वडीलोपार्जित आहे अथवा कसे हे शाबीत करण्याकरिता मुळ दाव्याचे सुनावणीवेळी पुरावा संधी उपलब्ध आहे असे मत नोंदविणे न्यायोचित आहे.

**१५.** अशा परिस्थितीमध्ये तुर्तातुर्त मनाईचे प्रथम दर्शनी घटक शाबीत होणेकरिता विलंब (Principle of delay, laches and acquiescence) हा महत्त्वाचा मुद्दा दिसुन येतो. वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली नाही. अशा परिस्थितीमध्ये वाद मिळकत मधील काही क्षेत्र पुर्वी विक्री केल्याचे दिसुन येत असताना

पुन्हा ते विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणे न्यायोचीत वाटत नाही. प्रथम दर्शनी वादींनी महत्वाचे तथ्य न्यायालयापासुन लपवून ठेवल्याचे दिसुन येते, त्यामुळे प्रथम दर्शनी केस वादीचे लाभात शाबीत होत नाही. अशी परिस्थिती असताना न्यायाचा समतोल आणि अपरीमीत नुकसान हे घटक वादींच्या हक्कात शाबीत होत नाहीत. तसेच विक्री केलेली मिळकत खरेदीदार यांनी विक्री करू नये असे आदेशीत करणे न्यायोचीत वाटप नाही, त्यामुळे मी मुदा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.४ करीता** –

**१६.** मुद्दा क्र.१ ते ३ चे नकारार्थी उत्तरावरुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.४ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |
| २. | खर्चाबाबत आदेश अंतिम आदेशाप्रमाणे. |
| | (खुल्या न्यायालयात जाहीर) |

KESHAV KRISHNA KHOMANE
Digitally signed by KESHAV KRISHNA KHOMANE
Date: 2025.10.16 17:35:59 +0530

दिनांक : १५/१०/२०२५.

(के.के.खोमणे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), आष्टी

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 15/10/2025 |
| Transcribed on | : | 15/10/2025 |
| Checked & signed on | : | 15/10/2025 |

**Sd/-**
U.D.Sasane,
Jr.Clerk.